सन २०१९-२० निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) राज्य योजनेअंतर्गत चंद्रपुर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणेकरिता विविध कामाकरीता पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/फ-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१७ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा :-</u>

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.५५/२१४/२०१९-२०, दि. २१.०५.२०१९
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.५५/६१७/२०१९-२०, दि. १६.०७.२०१९
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८.०७.२०१९
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१९/प्र.क्र.९३/अर्थ-३, दिनांक ०९.०७.२०१९
५. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक :- पूरक-२०१९/प्र.क्र.११७/ब-१, दिनांक १५.०७.२०१९
६. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- निसप-२०१९/प्र.क्र.२६१/फ-९, दि.१९.०७.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१९-२० राज्य योजनेअंतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ५६००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत असून त्यापैकी चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणे याकरिता रु.१०००.०० लक्ष इतका निधी मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२१ च्या परिपत्रकांन्वये अर्थसंकल्पीत निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत संदर्भ क्र.६ च्या शासन निर्णयान्वये रु.६००.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या योजनेंतर्गत चंद्रपुर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणेसाठी विविध कामाकरीता रु.२५२६.५७ लक्ष इतक्या निधीची पुरवणी मागणी जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात मान्य करण्यात आलेली आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये विधानमंडळाच्या जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात मान्य करण्यात आलेल्या पुरवणी मागणीचा निधी वितरीत करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार महसूल व वन विभागाने संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० चे खर्चाचे पूरक विवरणपत्र निर्गमित केलेले आहे.

त्याअनुषंगाने नियोजन व वित्त विभागास १०० टक्के निधी वितरणाचा प्रस्ताव सादर केला असता, वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकानुसार निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाखाली चंद्रपुर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणेकरिता सन २०१९-२० करिता पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु.२५२६.५७ लक्ष निधीपैकी Construction of Mati Nala Bandh at Botanical Garden Visapur- balance part payment रु.३७.३९ लक्ष ही बाब वगळून उर्वरित रक्कमेच्या ६० टक्केच्या मर्यादेत निधी वितरणास नियोजन व वित्त विभागाने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाअतर्गत चंद्रपुर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणेसाठी विविध कामाकरीता पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ व २ वरील शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ व ४ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार चंद्रपुर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बंगलोरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन निर्माण करणेकरिता विविध कामाकरीता प्रशासकीय/सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या कामाकरिता ५०-इतर खर्च **रु.१४९०.३० लक्ष** इतका निधी निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाअतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.:-

अ.क्र.	प्रस्तावित कामे	प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)	या आदेशान्वये वितरित करावयाची रक्कम (रु.लाखात)
(अ) वन विभागामार्फत करावयाची कामे			
१	Construction of Tree House at Botanical Garden at Visapur	२४.९२	१४.९५
२	Construction of Shed २०M x ७M Nursery aree at Botanical Garden at Visapur	१९.९५	११.९७
३	Supply and installation of Signages in Various areas of Botanical Garden Visapur	१७.००	१०.२०

(ब) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावयाची कामे			
४	संरक्षित भिंतीचे बांधकाम, प्रवेशद्वार सिमेंट कॉक्रीट पोच मार्ग इ.	४३.४४	२६.०७
५	प्रवेशद्वार व अनुषंगिक इमारतीचे बांधकाम	४१.६९	२५.०१
६	विज्ञान केंद्र (science center)/कृत्रिम तारांगण	९८.९९	५९.३९
७	रंगमंच / नाटयगृह (थीएटर)	१४५.७४	८७.४४
८	उपहारगृह (Construction of Cafeteria)	१११.४९	६६.८९
९	मत्सालय	३४५.११	२०७.०७
१०	फुलपाखरु उद्यान	१६१.२४	९६.७४
११	प्रशासकीय इमारतीचे बांधकाम	१६५.८३	९९.५०
१२	प्रदर्शनी केंद्र	१३८.४२	८३.०५
१३	वन विभागाचे कार्यालय	१९५.४३	११७.२६
१४	भूमिगत संग्रहालय	१५५.२९	९३.१७
१५	Construction of Cement Concrete Internal Road	२४५.४८	१४७.२९
१६	Providing system such as FAS.PA.ACS.CCTV & network & Passive security system	१८.१०	१०.८६
१७	अंतर्गत प्रदर्शनी साहित्य (Supply and installation of Signages in Various areas of Botanical Garden Visapur)	४.००	२.४०
१८	अंतर्गत प्रदर्शनी साहित्य (Providing installing exhibits for Science Centre)	४६३.००	२७७.८०
१९	पथदिवे/विद्युतीकरण (सौर LED पथदिवे लावणे)	८८.७४	५३.२४

अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडया प्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही. याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

५. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

७. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.

८. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

९. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांची राहील.

१०.शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

११.सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२.प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१३.सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ व ०९.०७.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१४.शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१५.सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६ २२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.६३१/व्यय-१०, दिनांक ०५.०९.२०१९ अन्वये व वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ व दिनांक ०९.०७.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/ २०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१८४३२२५६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.09.18 11:12:55 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर
५. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), मध्य चांदा वनविभाग.
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)